# कलस्सैकरांस पत्र

(Colossians)

**१**,२ **यहोवा** परमेश्वराच्या इच्छेने येशू ख्रिस्ताचा प्रेषित पौल आणि आमचा भाऊ तीमथ्य कडून **कलस्सैत** राहणऱ्या तसेच
३ येशू ख्रिस्तात पवित्र आणि विश्वासू लोकांना आमचा स्वर्गीय पिता व येशू ख्रिस्ताद्वारे कृपा व शांति प्राप्त होवो. **आम्ही**
४ प्रभु येशू आणि त्यांच्या पित्यास उपकारस्तुति करीत तुमच्या साठी विनंती करण्यात लागलो आहोत. आम्ही तुमच्या त्या
५ प्रेमा विषयी जे सर्व पवित्र लोकांसाठी आणि त्या विश्वासा विषयी जो प्रभु येशूत आहे, ऐकले आहे. हे त्या आशेमुळे
आहे जी तुमचयासाठी स्वर्गात राखली गेली आहे. तुम्ही या आशे विषयी शुभ वर्तमानात, सत्य वचनाद्वारे, या पूर्वी
६ ऐकले होते.**जे** वचन प्रथम तुम्हांस दिले गेले, जे अन्य लोकांना ही दिले गेले, या जगात त्याचा प्रभाव दिसतो आहे. जेव्हा
तुम्ही हा शुभ-संदेश ऐकला आणि खरोखर यहोवा परमेश्वराची दया जाण्ली हे वचन तुमच्यात देखील वाढत चालले
७ आहे. **हे** शुभवर्तमान/ही आशा, ज्या विषयी तुम्ही एपफ्रासा द्वारे ऐकले, तो आमचा सोबती व विश्वासू सेवक आहे
८ त्याने पवित्र आत्म्यात तुमच्या विषयी आम्हास सांगितले आहे. **या** कारणाने, ज्या दिवसापासून आम्ही देखील या विषयी
ऐकले, तुमच्याकरिता कळकळ व प्रार्थना न चुकता करतो, जेणे करून तुम्ही येशूची इच्छा, जी पूर्ण ज्ञान व आत्मिक
१० समजूतीने भरलेली आहे, जाणून भरपूर होत जावे. **तुमची** वागणूक येशूस आवडणारी असावी, प्रत्येक चांगल्या
कामात फळ देणारे व्हावे आणि यहोवा परमेश्वराच्या ज्ञानात वाढत जाऊन त्यांना प्रत्येक गोष्टीत आनंदित करा.

---

१:१ ***"पाठविलेले प्रेषित"***- रोम १:१; गलती१:१ "तीमथ्य"

१:२ कलस्सै इफिसाच्या उत्तरेकडे जवळ जवळ १६० कि.मी. दूर एक लहानसे शहर होते. तो तुर्कस्थानाचा एक भाग होता. हे शहर लावदिकीया जवळ होते.

१:३,४ रोम १:८; इफि १:१५,१६ शी तुलना करावी.

१:५ **"आशा"** - हे त्या आशेविषयी आहे, जी विश्वास ठेवणरे एके दिवशी प्राप्त करणार. ही ती आशा नव्हे जी त्यांच्यात सध्या आहे. वचन २७; तीतास १:२; २:१३ शी तुलना करावी.

**"ठेवलेली"** - १ पेत्र १:४.

**"शुभ वर्तमान"**- रोम १:१६; १ करिंथ १५:१-८

१:६ **"प्रभाव"** - मत्तय १३:८, मार्क ४:२६-२९. शुभवर्तमान तारण प्राप्ती साठी परमेश्वराचे सामर्थ्य आहे. (रोम १:१६ जेंव्हा स्पष्टपणे, धैयाने आणि प्रामाणिकपणाने हे सांगितले जाते, तेव्हा याचा परिणाम दिसून येतो.)

**"जाणले आहे"**- ज्ञान व परिणाम (फळ देणरी वृत्ती) यांतील संबंध पहा. मत्तय १३:२३ शी तुलना करा. "विपुल दया" योहान १:१४,१६; रोम १:७; इफिस २:८,९ ची टिप पहा.

१:७ **"एपफ्रास"**- ४:१२; फिलेमोन २३. हे वचन येशूच्या या सेवका विषयी सर्व काही सांगतात.

**"सेवक"** - रोम १:१; ६:१८-२२.

**"विश्वासू सेवक"** या हून उत्तम काय सांगितले जाऊ शकते?

१:८ "पवित्र आत्म्यात तुमचे प्रेम"-रोम ५:५, आमच्या जवळ केवळ स्वर्गीय पित्याचे प्रेम (ग्रीक भाषेत "अगापे" १ करिंथ १३:१ वरील टीप पहा) त्यांच्या द्वारेच होऊ शकते, हे आपण सर्व पृथ्वीवर खऱ्या विश्वासू लोकात पाहू शकतो.

१:९ **"न चुकता प्रार्थना करतो"**- विश्वासू लोकांकरीता येथे प्रार्थनेचा आणखी एक नमूना आहे-इफि १:१७-१९; ३:१६-१९; फिलिपै या पैकी कोणत्याही गोष्टीत तो भौतिक बाबी विषयी प्रार्थना करीत नाही. त्याची इच्छा हीच होती की त्यांनी बुद्धि, ज्ञान, शक्ति आणि प्रेम प्राप्त करावे. आपण देखील यालाच एक नमूना बनवू या. "येशूच्या इच्छेची ओळख"- रोम १२:२ तो अशी प्रार्थना या साठी करतो कारण ज्या गुणांना तो त्यांच्यात पाहू इच्छितो (वचन १०) ते सर्व यावर अवलंबून आहेत. आपण सृष्टिकर्त्याची इच्छा जाणल्यावरच त्याची इच्छा पूर्ण करू शकतो. "पूर्ण ज्ञान आणि आधिक समज" हा या पत्राचा एक विषय देखील आहे. वचन २८;२,३;३:१६. केवळ परमेश्वरच यांस देऊ शकतो. - इफि १:१७ शिक्षण किंवा दर्शन शास्त्र यास उत्पन्न करू शकत नाही. हे बायबल किंवा परमेश्वराला जाणण्यापेक्षा अधिक होय. ही दोन्ही स्वर्गातूनच प्राप्त होतात आणि याच्या प्राप्तीकरता आपणात स्वर्गिय पित्याबद्दल गोडी असणे आवश्यक आहे. तुलना करा. ईयोब २८:१२-२८; नीतिसूत्रे २:१-६; १ करिंथ १:२०,२५,३०;२:१०-१४

१:१० **"येशूस आवडणारे"**- इफिस ४:१, १ थेस्सलनी २:१२. बुद्धि आणि समज हे ध्येय नव्हेत. आम्ही कसे जगावे याविषयी ते आम्हास योग्य बनवतात आणि जर असे होत नसेल तर त्यास बुद्धि म्हणणे अयोग्य ठरेल.

**"त्यांना प्रत्येक गोष्टीत आनंदित करा"**- २ करिंथ ५:९; गलती १:१०; थेस्सलनी २:४१ जर आपण स्व:ताला प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला तर येशूला कधीच आनंदित करू शकणर नाही. येशूची जीवन शैली जशी होती, तशीच आमची ही असावी-फिलिपै २:५, योहान ८:२९. आमचे कार्य या बाबीवर अवलंबून नसावे की आम्हास काय हवे किंवा काय नको, आम्हाला काय आवडते किंवा आवडत नाही -मत्तय १०:३८,३९. या वचनाप्रमाणे जर आम्ही जगलो तर आमचे जीवन स्वर्गिय पित्या सारखेच होईल. (जसे दाविदाचे होते-१ शमुवेल १३:१४ वरील टिप पहा)

**"फळ देणारे"** - योहान १५:१-८.

११ **यहोवा** परमेश्वराच्या तेजस्वी सामर्थ्याने वलवंत होऊन, आनंदाने पूर्ण सहनशक्ती व धीर राखून स्वर्गीय पित्यास धन्यवाद
१२,१३ देत रहा, **ज्यांनी** आपणस योग्य बनवले या साठी की पवित्र लोकांसोबत प्रकाशात, वतनाचे भागीदार बनावे. **स्वर्गीय**
१४ पित्यानेच आम्हास अंधाराच्या सत्तेतून सोडवले, आपणस आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणले. **ज्यात** आपणस
१५ येशूच्या रक्ताद्वारे स्वतंत्रता किंवा अपराधांची क्षमा प्राप्त झाली आहे. **जो** अदृश्य यहोवाचे प्रतिरूप व सर्व सृष्टित
सर्वश्रेष्ठ आहे. त्यांच्याच द्वारे सर्व काही मग ते स्वर्गातील असो किंवा पृथ्वीवरचे, दिसणारे असो किंवा अदृश्य, मग
१६ राजासन असो किंवा राज्य, अधिपती किंवा शक्ती सर्व काही **त्यांच्याच** द्वारे आणि त्यांच्या साठीच निर्माण झाले आहे.
१७,१८ ते सृष्टीच्या पूर्वीपासून आहेत, त्यांच्याच द्वारे सर्व काही सांभाळले जाते. **ते** म्हणजे प्रभु येशू मंडळीचे मस्तक आहेत,

---

**"परमेश्वराचा ज्ञानात वाढत असतांना"**-केवळ परमेश्वराच्या इच्छेच्या ज्ञानात नव्हे तर, परमेश्वराच्या ज्ञानातही. फिलिपै ३:१०,२ पेत्र३:१८ शी तुलना करा.

१:११ **"बळकटी प्राप्त करून"**-इफिस ३:१६; फिलिपै ४:१३ 'तेजोमय'' शक्ती सृष्टिकर्त्याची ती शक्ती आहे जी खरे आत्मिक बळ देऊ शकते. पौलाची अशी इच्छा का होती की विश्वासू लोकांना ही शक्ती व हे बळ प्राप्त व्हावे? या साठी की त्यांनी अद्भुत कामें करावी? किंवा मोठे संदेश देणारे बनावे? नाही-पण या करता की त्यांनी कठीण प्रसंगाना सहन करावे, धीर व आनंद कायम राखून ठेवावा. आपल्या लहान स्थानात राहून चांगुलपणचे जीवन जगून परमेश्वरास सन्मान दयावा.

"सहनशक्ति आणि धीर'' रोम ८:२५; १करिंथ १३:४; १ थेस्सलनी ५:१४; इब्री ६:१२; १०:३६; १२:१; याकोब ५:१०.

**"आनंद"**-फिलिपै १:४; ३:१; ४:४.

१:१२ **"धन्यवाद"**-या पत्रात हा विषय वारंवार आलेला आहे (२:७;३:१५,१७;४:२) संपूर्ण पवित्र शास्त्रात देखील.

**"योग्य बनवले"** - परमेश्वराचे वतन प्राप्त करण्यासाठी त्यांनी काहीही केले नाही. हे मानवाच्या दृष्टीने अगदी अशक्य आहे. (रोम ३:१९,२०; इफि २:१-३; यिम्रया १३:२३). आत्म्यात नवीन जन्म झाल्यानंतरच आपण पित्याचे अपत्य बनल्यामुळे येशू सोबत वतनाचे हकदार बनतो-योहान १:१२,१३; ३:३-८; रोम ८:१६,१७, इफिस ४:१०.

**"वतन"**- इफिस १:१४,१पत्रे १:४.

**"प्रकाशात"**-परमेश्वर आणि येशूचा प्रकाश, तेजाचा प्रकाश- प्रकटीकरण २१:२४.

१:१३ येथे दोन वेगळया प्रकारची राज्ये आहेत. प्रत्येक व्यक्ति या पैकी कोणत्या तरी एका राज्यात आहे.

**"अंधार"**-प्रेषित २६:१८; लूक २२:५३; इफिस ६:१२; योहान १९-२०. अंधाराच्या साम्राज्याचा शासनकर्ता शैतान होय. येशू प्रकाश राज्याचा शसक आहे. मत्तय ४:१७. यात परमेश्वराच्या राज्याविषयी टिप पहा. येशू लोकांना स्वतंत्र करून आपल्या साम्राज्यात आणतात. आपले मूल बनवण्याद्वारे तो असे करतो. (२करिंथ ४:४-६; इफिस ५:८). यहोवा परमेश्वराचे हे कार्य पूर्ण जगात होत आहे.

**"आपला प्रिय पुत्र"**-मत्तय ३:१७.

१:१४ रक्ताद्वारे स्वतंत्रता अथवा इफिस १:७ अपराधांची क्षमा.

१:१५ **"जो"**-चा अर्थ आहे येशू ख्रिस्त.

**"अदृश्य यहोवाचे प्रतिरूप"**-परमेश्वर आत्मा आहे आणि त्यांना शारीरिक डोळ्यांनी पाहता येत नाही. (योहान १:१८; तीमथ्य १:१७; ६:१६; इब्री ११:२७). येशू दाखवितात की परमेश्वर कसे आहेत. मानव रूपात येशू परमेश्वरा सारखेच आहेत-२:९;योहान १:१,१४; १४:९; २ करिंथ ४:४; इब्री, १:३.

**"सर्वश्रेष्ठ"**-अनेक भाषांतरात प्रथम फळ हा शब्द वापरला गेला आहे, ज्याचा अर्थ आहे सर्वात महान, सार्वभौमिक - रोम ८:२९; इब्री १:६; १२:२३;स्त्रोत ८९:२७. पित्याचा स्वभाव पुत्रात आहे. तो सर्वकाळ राहणार. ज्याप्रमाणे परमेश्वराचा प्रारंभ नाही त्यांचा ही नाही. ते कधी "उत्पन्न" झाले नाहीत. यहोवा परमेश्वरा विषयी यहूदी लोक म्हणू शकत होते, की यहोवा परमेश्वर जुण्या कराराचे 'प्रथम फळ' आहेत कारण ते असे सृष्टिकर्ता आहेत ज्यांना कोणीही बनवले नाही. येथे पौल म्हणतो की येशू संपूर्ण सृष्टीचा स्वामी आहे. पुढील वचन स्पष्ट करते की याचा हाच अर्थ आहे. लूक २:११ आणि फिलिपै २:६ वरील टिप व वचन पहा.

१:१६ **"साठी"** येशूस **"प्रथम"** म्हटले गेले आहे, कारण त्यांच्या द्वारे संपूर्ण सृष्टी उत्पन्न झाली (योहान १:३; १ करिंथ ८:६; इब्री १:२; उत्पत्ति १:१)

**"राज्य/सत्ता अधिकार"** - इफिस १:२१; ३:१०.

१:१७ **"सृष्टीच्या पूर्वी"**- येशू जे परमेश्वराचे पुत्र आहेत, ते सृष्टिचा एक भाग नव्हते. ते सृष्टिच्या ही पूर्वी होते आणि त्यांच्याच द्वारे सृष्टि निर्माण झाली.

**"सांभाळले जाते"**-इब्री १:३ शी तुलना करा. संपूर्ण सृष्टी नष्ट होण्यापासून तेच वाचवतात. सर्वकाही संतुलित ठेवण्याची शक्ती त्यांचा ठायी आहे. परमेश्वराशिवाय असे कुणाबद्दल ही म्हटले जाऊ शकेल काय?

१:१८ **"मस्तक"** - इफिस १:२२-२३.

**"शरीर"** - रोम १२:५; १ करिंथ १२:१२,१३

**"मंडळी"**-मत्तय १६:१८.

**"प्रारंभ"** - ग्रीक शब्दाचा अर्थ आहे "स्त्रोत किंवा ऊगम" किंवा ज्यास प्रथम स्थान प्राप्त झाले आहे असे येशू पासूनच त्यांची

१९ तेच प्रारंभ आणि मेलेल्यांतून जिवंत होणाऱ्यां पैकी प्रथम आहेत, ज्यामुळे प्रत्येक बाबतीत त्यांनी सर्वश्रेष्ठ व्हावे **याच**
२० कारणाने स्वर्गीय पित्यास हे आवडले की येशूच्या ठायी संपणूतेचा वास असावा. **मी** म्हणतो की पृथ्वीवरील असो किंवा
२१ स्वर्गातील, सर्वांचा समेट येशूच्या वधस्तंभावरून वाहणाऱ्या रक्ताच्या द्वारे त्याने स्वत:शी करून घेतला आहे. **तुम्ही**
२२ देखील पूर्वी आपल्या वाईट कार्याद्वारे, मनातून दूर गेलेले आणि शत्रु होता **परंतु** येशू द्वारे स्वत:च्या रक्त-मासांच्या
देहात कोणत्याही प्रकारच्या वाईट नांवा पेक्षा अधिक, आपल्या दृष्टीत पवित्र आणि निर्दोष असे उभे करण्याकरीता
२३ तुमच्याशी समेट करून घेतला आहे. **तुम्ही** विश्वासात अढळ राहता, बळकट होता आणि जे शुभवर्तमान तुम्ही ऐकले
आहे, त्याची आशा बाळगता, तेच आकाशाखालच्या प्रत्येक सृष्टीस दिले गेले आहे, आणि जिचा मी पौल सेवक ही झालो
२४ आहे. **आता** माझ्यावर येतात आणि येशूच्या क्लेशातले जे उरले आहे त्यांना मी शरीर अर्थात मंडळी साठी आपल्या
२५ शरीरात पूर्ण करत आहे. **वचनाच्या** पूर्तिकरता स्वर्गिय पित्याने तुम्हांसाठी मला दिले आहे, मंडळीची देखरेख करणारे
२६ जे पद त्याच्या आधारावर मला सेवक बनवले आहे. **असे** या रहस्यामुळे आहे, जे युगानुयुग लपलेले होते, परंतु आता
२७ पवित्र लोकांवर ते प्रगट झाले आहे. **यहोवास** हे आवडले की परराष्ट्रीयांना या रहस्याचे (येशूच्या गौरवाची आशा)

---

मंडळी निर्माण झाली आहे आणि त्यांना सर्वात उंच स्थान मिळाले आहे.

**"मेलेल्यांमधून प्रथम जन्मलेला"** - प्रकटी १:५ याचा अर्थ केवळ हाच नव्हे की मृत्यू वर विजय प्राप्त करणारे प्रथम येशू आहेत. त्याहून मोठा अर्थ येथे अपेक्षित आहे. याचा अर्थ असा की येशूचे स्थान सर्वात उंच आहे. त्यांचया सारखेच मेलेल्यातून जे जिवंत होतील, त्या सर्वात येशू महान आहेत. रोम १४:९ शी तुलना करा.

**"सर्वप्रथम"**- इफिस १:२२; फिलिपै २:९-११. येशूस प्राधान्य मिळालेच पाहिजे आणि तोच त्यांचा हक्क आहे.

१:१९ सृष्टीकर्त्याची सर्व पूर्णता मानव येशूत होती. २:९; योहान १:१,१४.

१:२० **"समेट"** - संपूर्ण जग परमेश्वरापासून दूर गेले होते, पापात पडले होते (रोम ३:१९,२०) देवबापाचा क्रोध मानवाच्या वाईट कृत्यां विरूद्ध भडकला होता. (रोम १:१८) स्वर्ग व पृथ्वी यांत मित्रता नव्हती. महान परमेश्वराने समेट करण्याच्या हेतूने येशूचे रक्त- बलिदान करून हा समेट केला- योहान १:२९, रोम ५:१०; २ करिंथ ५:१९; इफिस २:१६.

१:२१ **"परके"**- इफिस २:१२; ४:१८.

**"शत्रु"**-रोम ५:१०; याकोब ४:४.

**"मनात"** - त्यांना माहित नव्हते की ते सृष्टीकर्त्याचे -स्वामीचे शत्रु आहेत. कारण त्यांचे विचार आणि मनातील इच्छा परमेश्वर विरोधी होती, ते परमेश्वराचे शत्रु होते. "दुष्कर्माद्वारे" पापामुळे मानव परमेश्वराचा शत्रु बनतो.

१:२२ वचन २० इफिस २:१६-१८. "पवित्र" इफि १:४;५:२५-२७

**"बदनामी पेक्षा अधिक"** -१करिंथ १:८, रोम ८:३३.

१:२३ **"जर"**-पौल येथे असे म्हणत नाही की समजा विश्वासू विश्वासात स्थिर राहणार नसला तर, परंतु पौल असे म्हणू इच्छितो की खरा विश्वासू कोणास म्हटले जाऊ शकते व तो काय करतो. विश्वासात कायम राहणे असे दर्शविते की त्यांचा परमेश्वराशी समेट झालेला आहे. तुलना करा १ करिंथ १५:२; इब्री ३:६,१४; १०:३८,३९; योहान १०:२७; लूक २२:३२; १ योहान २:१९

**"मुळावलेले"**-खरा विश्वास एका मजबूत खडकावर स्थिरावलेला असतो. (१करिंथ ३:११; इफिस२:२०) यामुळे विश्वासू दृढ बनतो.

**"आकाशाखाली"**-याचा अर्थ जगाच्या शेवटापर्यंत किंवा संपूर्ण विश्वात असा ही नाही- मार्क १६:१५, प्रेषित १३:४७. पौल त्यांना सांगतो की त्या क्षेत्रात शुभवर्तमान किती पसरलेले होते.

१:२४ **"तुम्हांसाठी जी दु:खे मी भोगतो"**- ४:१०,१८; २ करिंथ १:५,६; इफिस ३:१-१३. पौल शुभवर्तमानामुळे दु:ख भोगित होता, लोकांना येशूचे शिष्य बनवित होता आणि येशूच्या मंडळीस या पृथ्वीवर बनवू इच्छित होता. छळामुळे वो आनंदित नव्हता, पण त्याचा आनंद यासाठी होता की तो येशू व त्यांच्या लोकांसाठी जगत होता. या गोष्टीस तो एक शुभ संधि समजतो. फिलिपै १:२९; ३:१०; १पेत्र ४:१३-१६ शी तुलना करा.

**"कमी-कमतरता"**-वधस्तंभावर येशूच्या क्लेशत कांही कमतरता होती का? नाही, अजिबात नाही. जगाच्य पापांकरता बलिदान अपूर्ण होते काय? नाही; पौल या विषयी काही म्हणत नाही. हे खरे आहे की आमच्या अपराधकरता येशू एकदाच मरण पावले आणि सर्व कार्य त्यांनी पूर्ण करून टाकले- योहान १९:३०; इब्री १०:१०,१४. १ पेत्र ३:१८. येशू सध्या मंडळी तयार करत आहे. (मत्तय १६:१८; इफिस २:१९-२२). आपल्या सेवकांना ते सहकार्य करणयाची शुभ संधि देत आहेत, या जगात त्याचा अर्थ आहे समस्या, छळ, दु:ख आणि अडचणी समस्या संपलेल्या नाहीत- आता ही त्यात "कमी" आहे. मंडळी (चर्च) करता आणि त्यांच्या सोबत दु:ख भोगण्याच्या आशीर्वादास, वर्तमान काळी त्यांनी आपल्या सेवकांसाठी ठेवले आहे.

१:२६ इफिस ३:२-९; १६:२५-२७

**"पवित्र लोकांवर"**-रोम १:१७.

१:२७ **"धन"**- इफिस ३:८ या सर्व धनाच्या तुलनेत मनुष्य- निर्मीत प्रत्येक प्रणाली निर्धन ठरते. "येशू ख्रिस्तात" योहान १७:२३; रोम ८:९,१०; २करिंथ १३:५; प्रकटी ३:२०.

**"गौरवी आशा"** रोम ५:२; ८:१८ जर येशू आमच्यात नाही तर आमच्याजवळ तारण आणि परमेश्वराचे गौरव पाहण्याचा सबळ आधार नाही.

२८ तेजोमय धन प्रगट करावे. **म्हणून** आम्ही उपदेश आणि बोध करतो व पूर्ण ज्ञानासहित प्रत्येक मनुष्यास शिकवतो,
२९ जेणेकरून प्रत्येकास येशू ख्रिस्तात स्थिर व पूर्ण उभे करावे. **ह्याकरता** त्या सामर्थ्यानुसार त्यांची जी शक्ती माझयात
**२** आहे, जी मला शक्तिमान करून कार्यशील करते, तन मन लावून मी श्रम करतो आहे. **ज्या लोकांनी** मला पाहिले नाही
२ व जे लावदिकी यात आहेत त्यांना मी सांगतो की तुमच्यासाठी मला किती संघर्ष करावा लागतो. **प्रेमाने** एकमेकात
बांधले जाऊन आपल्य हृदयात प्रोत्साहित व्हावे, जेणेकरून ज्ञानाच्या पूर्ण आश्वासनाच्या धनाने परमेश्वर पिता व येशू
३,४ ख्रिस्ताच्या रहस्यातील संपूर्ण ज्ञानात प्रवेश प्राप्त करावा. **येशू** ख्रिस्तात ज्ञानाचा खजिना लपलेला आहे. **मी** यासाठी असे
५ म्हणतो की, कोणीही तुम्हांला फसव्या-लाघवी शब्दाने भूलवू नये. **जरी** मी दैविक रित्या तुमच्यात नसलो तरी
६ आत्मिक रितीने तुच्या सोबत आहे. तुमची स्थिरताव येशूच्या विश्वासातील अनुशासन पाहून मी प्रसन्न आहे. **म्हणून**
७ जसा तुम्ही येशूचा स्विकार केला तसे त्यात वाढत जा. **विश्वासात** स्थिरावलेले व मुळावलेले आणि बळकट होत

---

१:२८ प्रेषित २०:२०-२४ शी तुलना करा.
**"संपूर्ण ज्ञान"** ते ज्ञान जे त्याला परमेश्वराने दिले - १ करिंथ १:३०; २:७,१०,१२,१६. तो स्वत:च्या बुद्धीचा गर्व करत नव्हता. त्याने अशी प्रार्थना केली की त्या लोकांना ही पूर्ण बुद्धी प्राप्त व्हावी. वचन ९ त्याला माहित होते की, हे शक्य होते, विश्वासू देखील प्राप्त करू शकतात- याकोब १:५. "सिद्ध" २ करिंथ ११:२; इफिस ४:१२-१५. मत्तय ५:४८; फिलिपै ३:१२, १५; इब्री ६:१;१०:१४.

१:२९ पौलाकरता इफिस ३:२० हा मात्र एक सिद्धांत नव्हता. महत्वाची गोष्ट ही आहे की पौलाच्या जीवनात परमेश्वराची शक्ती कार्य करत होती, परंतु ही सोपी प्रक्रिया नव्हे. वास्तविकता याच्या उलट होती-याचा अर्थ होता परिश्रम आणि संघर्ष (हाच ग्रीक शब्द ४:१२; लूक १३:२४; १ करिंथ ९:२५ मध्ये याचा उपयोग केला गेला आहे.)

२:१ **"संघर्ष"** - १:२९ पौलाची भेट विश्वासू लोकांशी होती किंवा नव्हती पण तो त्यांच्या साठी मध्यस्थीत संघर्ष करत होता. त्याला माहित होते की प्रत्येक विश्वासू बहुमूल्य आहे. तो जगापुढे येशूचे नांव पुढे करता होता.
**"लावदिकीया"** - प्रकटी ३:१४

२:२ पौलाच्या प्रार्थनेत असलेले आणखी एक सत्य आणखी एक नमूना १:९.
**"प्रोत्साहित"** पौलाने यास आवश्यक सेवा जाणली होती.
**"प्रेमात बांधलेले"**- रोम १२:१०; इफिस ४:२,३; फिलिपै २:२..
**"समज"**-धनाशी संबंधित त्याचे विचार काय होते ते पहा. तुलना करा नीति ३:१३,१४; ८:१०,१९; १६:१६.
**"रहस्य"** - परमेश्वराकडून प्राप्त झालेले प्रकाशन मत्तय १३:११ वरील टीप पहा.
"परमेश्वर बाप आणि येशू ख्रिस्त"- जो पर्यंत परमेश्वर सांगत नाही तो पर्यंत कोणीही येशूस जाणू शकत नाही. २ करिंथ ४:४-६. याच प्रमाणे जो पर्यंत येशू प्रगट करत नाही तो पर्यंत कोणीही परमेश्वराशी ओळख करू शकत नाही. मत्तय ११:१७. येशू आणि परमेश्वराचे ज्ञान प्रत्येक प्रकारच्या ज्ञानाहून अधिक मोठे धन होय. तुलना करा. फिलिपै ३:७-११, योहान १७:३.

२:३ जर आपण येशूस ओळखतो तर आपण संपूर्ण बुद्धिच्या स्त्रोतास जाणतो. "संपूर्ण" शब्दावर लक्ष दया. येशूत असिमित बुध्दी आहे जर आपण येशूस जाणले नाहीत तर जरी आपणस तत्वज्ञान किंवा विश्व-ज्ञान प्राप्त असले तरी आपल्यात आत्मिक बुद्धिची कमतरता आहे. पहा १ करिंथ, १:२०,२१. लोक ज्याला तारण प्राप्तीचा 'ज्ञानमार्ग' म्हणतात, वास्तविक पाहता तो अभिमान व कठोरतेचा मार्ग असतो मुक्तिचा नव्हे.

२:४ आपल्या **"पोकळ शब्दांनी"** दुसऱ्यांना बाध्य करणरे आणि स्वत:ला फसविणरे लोक आपण पाहता असतो. असे लोक, मानवाने तयार केलेल्या पद्धती, तत्वज्ञानाच्या गोष्टी किंवा धार्मिक बाबी तयार करतात ज्या ऐकावयास बऱ्या व खऱ्या वाटतात. आपण येशू वरचा विश्वास, सत्याची ओळख व त्यापासून मिळणारी सत्यता या द्वारे स्वत:ला चुकीच्या मार्गात जाण्यापासून वाचवू शकतो.

२:५ **"आत्म्यात"**-१ करिंथ ५:३,४ पौल अशी शिकवण देत नाही की, त्याचा आत्मा देह सोडून दूसऱ्या स्थानी जाऊ शकतो, याचा अर्थ त्याचे मन आणि विचार त्या लोकांवर व त्यांच्या कृतीवर लागलेले होते असा होय. जी काही सूचना त्यांच्याबद्दल त्याला मिळत असे त्यावरून त्याने ही. अपेक्षा केली होती की ते कानांना बऱ्या वाटणाऱ्या तर्काच्या धोक्यात पडणार नाहीत.
**"अनुशासन-शिस्त"**- १ करिंथ १४:४० "मजबूत विश्वासाची स्थिरता" यापासून आपण योग्यता प्राप्त करतो, जिच्या मदतीने आपण धोकादायक शिक्षणपासून व सैतानाच्या प्रत्येक चलाखीच्या विरोधात उभे राहू शकतो.
(२ करिंथ १:२४; इफिस ६:१६; १ पेत्र ५:९, १ योहान ५:४)

२:६ मत्तय १:१ यात **"मसीहा"** आणि **"येशू"** यावर आणि लूक २:१ यात स्वामी प्रभूवर जी टीप आहे ती पहा. ऐतिहासिक येशू विषयी त्यांनी सत्य प्राप्त केले होते. एखादया गुप्त सत्येविषयी किंवा काल्पनिक येशू विषयी त्यांनी जाणले नव्हते. ते अशा येशू वर विश्वास करत होते ज्यांच्याजवळ शरीर होते व परमेश्वराने ज्यांचा अभिषेक केला होता व जे स्वर्गातले होते. लक्ष द्या की "प्रभु" चा त्यांनी विश्वासाने स्विकार केला होता. त्यांना याच सत्याविषयी शिकवले गेले होते, ज्यांवर त्यांनी विश्वास देखील ठेवला आणि स्वत:ला त्यांच्या स्वाधीन केले होते. याच विश्वासात त्यांनी स्थिर रहावे (२करिंथ ५:७)
"वाटचाल करावी- आयुष्यक्रम चालवावा"- किंवा जीवन जगावे - इफिस २:१० वरील टीप पहा.

२:७ **"मुळावलेले व बळकट असणारे"** - इफिस ३:१७ शी याची तुलना करा. वृक्ष आणि रोपे यांशी विश्वासणाऱ्यांची तुलना केली जाऊ शकते. मत्तय १२:३३; १३:१-३०; स्तोत्र १:३. येशू एक उत्तम भूमि आहे; जिच्यात विश्वासणाऱ्यांची मुळे आहेत. ही मुळे खोल आहेत, परंतु हळूहळू त्यांची वाढ होत आहे. विश्वासू एका इमारती प्रमाणे आहेत जिचा पाया येशू होय, ज्यावर ते रचले जात आहेत इफिस २:१९-२२; १ पेत्र २:४,५; १ करिंथ ३:११.

८ धन्यवाद करीत आनंदित रहा; जसे तुम्हास शिकवले गेले तसे प्रसन्नचित्त राहणास उत्तेजित असा. **सावध** असा, कोणी
९ कोणत्याही तत्वज्ञानाद्वारे आणि पोकळ धोक्याने जी मानव परंपरेनुसार व जगाच्या प्रारंभिक ज्ञानावर आधारित आहे,
९,१० तुम्हास नष्ट करू नये; **येशूच्या** ठायी-स्वर्गिय पित्याची परिपूर्णता दैहिक दृष्टया वास करते. **जो** सर्व प्रसन्नता व
११ अधिकरांचा प्रधान आहे, त्यात तुम्हीही पूर्ण होत जाता. **त्यातच** तुमची अशी सुंता झाली जी हाताद्वारे केली जात नाही
१२ ही येशूने केलेली आत्म्याची सुंता होय. या सुंतेत अपराधांना शरीरातून काढून टाकले जाते. **आणि** बाप्तिस्म्यात तुम्ही
ख्रिस्तात पुरले गेलात आणि सृष्टिकर्ताच्या कामाद्वारे विश्वासाने उठविलेहि गेलात, ज्यांनी येशूला मेलेल्यातून जिवंत १३

---

**"विश्वासात"**-येशूच्या सत्यात त्यांनी अधिक बळकटीने स्थिर होऊन विश्वास करावा.

**"धन्यवाद"**-इफिस ५:४,२०;१ थेस्सलनी ५:१८.

२:८ **"सावध असणे"**-एक वाईट शिकवण देणारा धोका होता- चूक विचार सरणीत फसण्याचा धोका होता. १६-३३ यात पौल त्या मताविषयी बोलतो ज्याचा सामना कलस्सै येथील लोक करत होते व ज्याचा सामना आज आम्ही देखील करतो, यात सारखेपणा किंवा भिन्नता होऊ शकते, पण आपण देखील सावध असणे गरजेचे आहे. प्रत्येक पीढीत एक गोष्ट पक्की आहे- कोणतेही तत्वज्ञान किंवा धार्मिक विचार ज्यात येशूस वेगळे ठेवले जाते, ते पोकळ व धोकादायक आहे.

तत्वज्ञान एक भूक आहे, ज्याला मनुष्य ज्ञान संबोधतो. तर्क आणि विवाद यांच्या मदतीने सत्यता व वास्तविकतेचा स्वभाव प्राप्त करण्याचा एक प्रयत्न आहे. येशूच सत्य आहे आणि सर्व आत्मिक ज्ञान त्यात लपलेले आहे. तत्वज्ञानाच्या पद्धती लोकांना या ज्ञानापर्यंत पोचवू शकत नाहीत. आत्मिक गोष्टी विषयी जे सत्य मानवाने जाणवे असे परमेश्वराला वाटते ते याच ज्ञानात होय. तत्वज्ञान मात्र एक कल्पना होय. हे शास्त्र आपल्याला परमेश्वरापर्यंत कधीच नेऊ शकत नाही. तत्वज्ञानी साधारणत: एकमेकाच्या विरोधात बोलतात आणि अशा बाबी विषयी चर्चा करतात ज्या त्यांच्या बुद्धीपलीकडच्या आहेत ज्यांच्या बद्दल त्यांना ही ज्ञान नाही.

येशू ख्रिस्त परमेश्वराचे ज्ञान आहेत (१करिंथ १:२४) ते आपल्या समोर आहेत. त्यांच्यातच सर्वज्ञानाचे खजिने आहेत. ही मनोरंजक गोष्ट आहे की "तत्वज्ञानी" हा शब्द पूर्ण पवित्रशास्त्रात केवळ येथेच आला आहे. इब्री व ग्रीक भाषेत (प्रेषित १७:१८) तत्वज्ञानी शब्दांचा उल्लेख फक्त एकदाच केला गेला आहे- १ करिंथ १:२० अशाप्रकारे बायबलचे लेखक परमेश्वरीय आत्मिक बुद्धिच्या क्षेत्रोत तत्वज्ञानाची निरूपयोगिता प्रगट करतात. जर सृष्टिकर्ता एखादया बाबीकडे दुर्लक्ष करतो किंवा त्याचा अस्विकार करतो तेव्हा आपण असे म्हणू शकतो की ज्या गोष्टी परमेश्वर आपणास शिकवू इच्छितात त्या गोष्टीत याची काही महत्वाची भूमिका नाही.

"नष्ट" ग्रीक भाषेत "तुमची शिकार करू नये" किंवा "तुम्हास बंदी बनवू नये".

**"मानवी परंपरा"**-जे तत्वज्ञान कलस्सैच्या ख्रिस्ती लोकांना अस्वस्थ करत होते, ते मानव परंपरा (बोली किंवा लेखी भाषा) जगिक गोष्टीपासून शिकल्या जाणाऱ्या बाबींवर आधारित होते. हे तत्वज्ञानी केवळ पायाभूत गोष्टीवर (परंतु कदाचित खोल विचार करणाऱ्या गोष्टीवर गर्व करत होते) अवलंबून होते. त्यांची विचार सरणी येशूवर आधारित नसल्यामुळे ही विचारधारा स्थिर नव्हती, म्हणून तेथे खऱ्याज्ञानाचा प्रश्नच नव्हता. या करता जे काही ही विचार प्रणाली देऊ शकत नव्हती ते देण्याची प्रतिज्ञा करत होती. जसे हे त्यावेळी सत्य होते, आज देखील आहे. आज ही असे तत्वज्ञान व अशी मते आहेत जी परंपरा व जुण्या धार्मिक लेखांवर आणि मात्र मानवी कल्पनेवर टिकलेली आहेत. हे तत्वज्ञान येशू ख्रिस्ताला अगदी वेगळे ठेवते व येशूच परमेश्वराचे सत्य ज्ञान आहेत. याच करता ही सर्वमते पोकळ व धोका देणारी आहेत.

२:९ १:१९ पहा. याचा अर्थ हाच की येशूच्या ठायीच सत्य परमेश्वर होते. तेच सृष्टिकर्ता आहेत. अलौकिक स्वभावाची संपूर्ण परिपूर्णता त्यांच्याच ठायी आहे. फिलिपै २:६; लूक २:११ पहा.

२:१० परमेश्वरीय आत्म्याद्वारे **"येशूत"** सर्व विश्वासू स्वर्गिय पित्याशी जुळलेले आहेत. योहान १७:२०-२३; १ करिंथ १२:१२,१३; इफिस १:४,७,११,१३. या करता बुद्धिमान व पवित्र जीवन जगण्याकरता विश्वासणाऱ्यांना जे काही हवे ते सर्व येशूच्या ठायी त्यांच्या जवळ आहे. जी परिपूर्णता त्यांना दिली गेली ती परमेश्वराची जबाबदारी नव्हे. मानव कधी सृष्टिकर्ता बनू शकत नाही किंवा परमेश्वराचे गुण प्राप्त करू शकत नाही (उत्पत्ति १:२६; स्त्रोत ९:२०; यशया ४०:६-८, १२-१६) येशू ख्रिस्तात परमेश्वराने विनशर्त कृपा, शक्ति आणि बुद्धि दिली आहे. ही गोष्ट समजून स्वत:साठी त्यांना त्या प्राप्त करून उपयोगात आणल्या पाहिजेत. योहान १:१६-१८; इफिस ३:१९ आणि ५:१८ याशी तुलना करा.

**"मस्तक"** - इफिस १; २०-२३; फिलिपै २:९-११.

२:११ **"सुंता झालेली आहे"** -यहूदी लोकांच्या प्रथेनुसार पौल येथे त्या खऱ्या आत्मिक अर्थाकडे इशारा करत आहे जी यहूदी लोकात कायम होती. रोम २:२८,२९; फिलिपै ३:३ पहा. ग्रीक भाषेत "सार्क्य" म्हणजे शरीर- (रोम ७:२५ या वरील टिपणे पहा) शरीर कधीही चांगले बनू शकत नाही कारण याला मरणे आवश्यक आहे. येशूने आमचे स्थान ग्रहण करून यास मारून टाकले. त्यांनी विश्वासू लोकांशी याचे नाते तोडले आहे. ३:३; रोम ६:६; ७:१७; ८:९ त्यांच्या जवळ एक नवीन आत्मा एक नवीन स्वभाव आहे. जुण्या जीवनापासून त्यांना वेगळे केले आहे. ३:९-१०; २ करिंथ ५:१७; याचा अर्थ असा नव्हे की वास्तविक पापमय स्वभाव त्यांच्यात कार्यशील नाही. रोम ७:१८,१९; गलती ५:१७.

२:१२ **"बापतिस्म्याद्वारे येशूत पुरले गेले आहेत"**. रोम ६:३,४. "जिवंत केले गेलेले"इफि २:६ "यहोवाच्या कृतीद्वारे विश्वासाने" रोम ४:२०,२१,२४ शी तुलना करा. येशूला शारीरिक रीतिने जिवंत करून ज्यांनी आपले सामर्थ्य दर्शविले त्याच परमेश्वरावर आम्ही विश्वास करतो, तेच आम्हाला आत्मिक मृत्यूतन जिवंत करतात. योहान ५:२४; रोम १०:९,१० **"मेलेले....उठविले"**-इफिस २:१-५.

केले. **तुम्ही** आपल्या अपराधांनी व दैहिक कमतरतेने मेलेले होतात, त्या सर्व अपराधांची क्षमा करून परमेश्वराने येशू
१४ बरोबर तुम्हाला ही जिवंत केले. **तो** न्याय जो आमच्या विरोधात होता, येशून वधस्तंभाला खिळून दूर केला व पूर्णपणे
१५ मिटवून टाकला. **येशूने** सत्ताधिशांना व अधिकाऱ्यांना लुटून, वधस्तंभाद्वारे त्यावर जय प्राप्त केला व त्या सर्वांचा
१६ उघड उघर तमाशा केला. **तर** मग खाण्यापिण्या विषयी, सणवार साजरा करण्या विषयी, नवीन चंद्र मानण्याविष्यी
१७ किंवा शब्बाथ पालनाविषयीचा तुमच्या साठीचा निर्णय इतर कोणीहि घेऊ नये. **या** सर्व बाबी पुढे होणाऱ्या गोष्टींच्या
१८ छाया आहेत, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे येशू होय. **स्वत:ची** लीनता, स्वर्गदूतांची स्तुति उपासना, अदृश्य गोष्टी
आणि आपल्या शारीरिक मनाच्या व्यर्थ गर्वाद्वारे कोणीहि तुम्हास तुमच्या बक्षिसापासून वंचित करता कामा नये. असा
१९ व्यक्ति दृश्य किंवा दिसणाऱ्या गोष्टींत लिप्त असतो. तो स्वत:च्या मानवी समजूतीनुसार व्यर्थ गर्व करतो **आणि**
मस्तक अर्थात येशूला धरून राहत नाही. या मस्तकापासून सर्व शरीराला (मंडळी) सांधे व बंधने ह्यांच्या द्वारे

---

**"क्षमा करून"**-१:१४; इफिस १:७.

२:१४ इफिस २:१५ **"आमच्या विरोधात"** परमेश्वराचे नियमशास्त्र लोकांच्या विरोधात होते कारण लोकांचे स्तर हवे तसे नव्हते. नियमशास्त्रानुसार लोकांना दंड व मृत्यूची शिक्षा मिळायला हवी होती. गलती ३:१०; रोम ३:१९;४:१५; ७:१२-१४.

**"वधस्तंभाला खिळून"**-येशूने आमचे स्थान ग्रहण करून आमच्या विरोधात असणारा दंड नियमशास्त्राचा शाप सहन केला.गलती ३:१३ येशू शास्त्राच्या आधीन होऊन मरण पावले आणि त्यांच्या सोबत सर्व विश्वासू ही मेले आहेत. (परमेश्वरीय दृष्टिकोनातून पाहिल्यास) कारण ते नियमशास्त्राकरता मेलेले आहेत, याचा अर्थ असा की त्यांच्याकरता नियमशास्त्र वधस्तंभाला खिळले गेले व ते मेले आहे. रोम ७:१-६.

२:१५ **"सत्ताधिशांना व अधिकाऱ्यांना"** येथे पौल- सैतान व दुष्ट आत्म्यांकडे इशारा करतो आहे. (इफिस ६:१२) त्यांनी वधस्तंभाद्वारे नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता - लूक २२:५३ पण याच्या अगदी विरूद्ध झाले; वधस्तंभावरील मृत्यू व जिवंत होण्याद्वारे येशू त्यांच्यावर विजयी झाला आणि त्यांच्या नियंत्रणातून त्याने आमची सुटका केली. योहान १२:३१; इब्री २:१४,१५.

२:१६ २३ पौल आता खोटया शिक्षकांविषयी सांगतो, कारण "प्रभावशली शब्दांद्वारे' ते कलस्सैतील लोकांना धोका देत होते (वचन ४). "कोणी दूसरा व्यक्ति''येथे तो हया यहूदी लोकांकडे इशारा करतो आहे जे आतापर्यंत "लेखी नियमांशी अटीं समवेत जुळलेले आहेत.''

(मोशे चे नियम शास्त्र - वचन १४)

**"खाण्या-पिण्याकरता"**-लेवीय ११:१;मार्क ६:१८,१९;प्रेषित १०:९-१६; रोम १४:१-४ टीप पहा.

**"सण"** येथे यहूदी लोकांचे विशिष्ट दिवस आणि कालाविषयी -इशारा केला आहे. विश्वासू लोक आता जुण्या कराराच्या रिती-नियमांच्या अधीन नाहीत. रोम १४:५-८; गलती ४:१०,११ यात "शब्बाथा'' विषयी दिलेले नोट्स पहा. हे त्याच लेखी 'नियमावली' चा शाप आहेत, जे येशूने वधस्तंभला खिळून दिले -१४.

२:१७ **"छाया"**-इब्री ८:५; १०:१

"महत्वाची'' येशूच्या सत्याकडे, जुण्याकराराचे नियम व रीति-विधी संकेत करतात.

२:१८ आता पौल आणखी एका धोक्याविषयी सांगतो. कलस्सेतील काही लोक एका खोटया धार्मिक मार्गावर चालत होते. स्वत: रचलेल्या लीनतेचा त्यांना अभिमान होता आणि ते देवदूतांची पूजा देखील करत होते. त्यांची ही उपासना व खोटी दीनता त्यांच्या जीवनात कायम होती. त्यांचे म्हणणे असे होते की "मानव स्वत: सृष्टिकर्त्या पर्यंत जाऊ शकत नाही, सृष्टिकर्ता त्यांच्यापेक्षा कितीतरी महान आहे. तो इतका पवित्र आहे की त्याच्या पर्यंत कोणी पोचू शकत नाही म्हणून दूसऱ्या मध्यस्थाद्वारे मानवाने आराधना करावी आणि हे मध्यस्थ म्हणजे देवदूत होत.; आज देखील काही धार्मिक लोक असा तर्क समोर ठेवतात. देवदूतां ऐवजी संत म्हणवल्या जाणाऱ्या लोकांची ते पूजा करतात, असे संत जे मरण पावले आहेत. अशा मध्यस्थांनी त्यांच्यासाठी प्रार्थना करावी अशी या लोकांची इच्छा असते. याशिवाय काही लोक आहेत जे सृष्टिकर्त्याऐवजी दूसऱ्या ईश्वर म्हणवल्या जाणाऱ्या लोकांची ते उपासना करतात. हे सर्व परमेश्वराच्या लोकांची ते उपासना करतात. हे सर्व परमेश्वराच्या वचनांच्या विरोधात आहे आणि बायबलमध्ये याचे वर्णन देखील आहे. निर्गम २०:१-६; योहान १४:६; १ तीमथ्य २:५; इब्री १०:१९-२२.

**"बक्षिस"**- १ करिंथ ९:२४; २ तीमथ्य २:५; ज्या शर्यतीत विश्वासू लोक धावत आहेत, त्यात त्यांना कोणीही थांबवू नये. जर असे झाले तर त्यांना मिळू शकणरे बक्षिस ते प्राप्त करू शकणार नाही.

**"स्वत:ची लीनता"** ही पवित्र आत्म्याद्वारे दिलेली लीनता नव्हे;

**"अभिमान"**-स्वत: उत्पन्न केलेली लीनता होय. वास्तविक पाहता हा गर्व होय जो बाहेरून लीनते सारखा भासतो.

**"शारीरिक मन"**-असे शारीरिक मन जे वाईट आहे. ज्या लोकांबद्दल येथे सांगितले गेले आहे, असे वाटते की त्यांचा स्वभाव उपासना व विचारधारा त्यांच्या त्या वाईट मनानीच उत्पत्ति होती; असे असून देखील ते स्वत:ला खूप आत्मिक समजत असावेत.

२:१९ **"मस्तक"**-अर्थात येशू ज्यांना ते धरून राहत नाहीत.

कलस्सैत राहणरे खोटे शिक्षक येशूच्या नियंत्रणात नव्हते, येशूच्या शिकवणूकीतीह नव्हते म्हणून ते भटकलेले होते. येशूचे शिष्य होण्याचा दावा ते करत होते पण त्यांची शिकवणूक व वर्तन पाहिल्यास ते तसे नव्हते.

२० पालनपोषण होऊन, एक होत जाऊन, परमेश्वरापासून उन्नति प्राप्त होते. **कारण** तुम्ही जगाच्या प्राथमिक गोष्टींसाठी
येशूत मेला आहा, तर मग सांसारिक लोकांसारखे, त्या नियमांचे दास-गुलाम का बनता? याला स्पर्श करू नका, त्याला
२१,२२ चाखू नका, हे अमलात आणू नका. **या** सर्वगोष्टी ज्या मनुष्यांच्या आज्ञेनुसार-सिद्धांतानुसार आहेत, **ज्ञान** दाखविण्या
संबंधी असो किंवा निवडक भक्ति-रीती विषयी असो, लीनता व शरीराला कष्ट देण्याची बाब असो, या सर्व गोष्टी,
**३** शरीर स्वभावाच्या लालसेला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने महत्वाच्या नाहीत. **जर** येशू बरोबर तुम्ही उठविले गेलात
२ तर स्वर्गिय वस्तुंची कामना करा, जेथे स्वर्गिय पित्याच्या अधिकारांसोबत येशू हजर आहेत. **पृथ्वीवरील** नव्हे तर
३ स्वर्गातील गोष्टीकंडे मन लावा. **कारण** तुम्ही मागील जीवनाकरता मेलेले आहात आणि येशूद्वारे स्वर्गिय पित्यात तुमचे
४ आत्मिक जीवन दडलेले आहे. **जेव्हा** येशू जे आपले जीवन आहेत, प्रगटतील तेव्हा तुम्ही देखील त्यांच्याबरोबरीने
५ मोठ्या तेजात प्रगट व्हाल. **या करता**, या पृथ्वीवरील तुमच्या शारीरिक लालसा जसे-जारकर्म, अमंगळपणा अशुद्धता,

---

२:२० **"येशू सोबत मेलेले"**-रोम ६:६-८; गलती २:२०.

**"प्राथमिक बाबींविषयी"**- (वचन ८; गलती ४:३) जुण्या सृष्टिशी संबंधीत असणाऱ्या गोष्टी ज्या येशूच्या नवीन आत्मिक सृष्टिच्या नाहीत.

२:२१,२२ काही लोक असे समजत होते (आता देखील समजतात की भोजन पेय इत्यादि संबंधित नियम व पद्धती, आत्मिक जीवनाचे केंद्र आहेत. येशू तर विश्वास ठेवणरे, या सर्व गोष्टींसाठी मेलेले आहेत.)

२:२३ **"ज्ञान दाखविण्याद्वारे"**- पृथ्वीच्या अधिकांश लोकांना संतुष्ट करण्यासाठी हे पर्याप्त आहे. परमेश्वराकडून मिळणरे ख्रे ज्ञान ते प्राप्त करू इच्छित नाहीत. हे त्यांच्या जवळ नाहीच.

**"आपल्या निवडक भक्ति-विधी"**-पुष्कळ लोक आपल्याच पद्धतीने उपासना करू पाहतात.; असे करताना ते परमेश्वराच्या विधीकडे दुर्लक्ष करतात. मत्तय १५:७-९; योहान ४:२३,२४; निर्गम २०:१-६; स्तोत्र २९:२; नीति १४:१२.

**"शरीरास कष्ट देण्यास"**-काही लोक असा विचार करतात की आपल्या शरीराला कष्ट दिल्याने, त्याच्याशी वाईट व्यवहार केल्याने, सन्यास घेतल्याने ते फार आत्मिक बनतील. संयम व शरीर नियंत्रणत ठेवणे चांगले आहे. (१ करिंथ ९:२७) परंतु यास प्राप्त करण्याच्या पद्धती परमेश्वराला ग्रहण योग्य नाहीत. पौल ज्या गोष्टींचा उल्लेख करतो त्या, किंवा इतर गोष्टीदेखील मानवाला आत्मिक बनवू शकत नाहीत अथवा पापांवर विजय देऊ शकत नाही. केवळ एकच मार्ग आहे आणि तो येशू ख्रिस्ताद्वारे प्राप्त होतो. याविषयी पौल पुढील अध्यायात शिकवतो.

३:१,२ कलस्सैत राहणाऱ्या लोकांना खोटे शिक्षक दावू पाहत होते, पण खरी गरज होती मानवाच्या नव्या आत्मिक जीवनाची (२:४,८,१६-२३).

**"येशू सोबत जिवंत केलेले"**-२:१३; रोम ६:४,५; इफिस २:४-६ ज्या येशूने सर्वांसाठी आपले प्राण दिले त्या ख्रिस्तात विश्वास ठेवणारे देखील मेलेले आहेत आणि आता ख्रिस्ताबरोबर जिवंत केले गेले आहेत. ज्यावेळी त्यांनी येशूची विश्वासाद्वारे स्विकार केला त्यावेळी त्यांच्या जीवनात जणू हा एक जिवंत अनुभवच झालेला आहे.

नवीन जन्म प्राप्त केला. १ योहान १:१२,१३. येशू संपूर्ण अधिकारासंह स्वर्गात विराजमान आहेत. इफिस १:२०; फिलीपै २:९; इब्री १:३. तेथेच प्रत्येक विश्वासणाऱ्यांचे विचार व इच्छा असाव्यात. येशूस प्रसन्न ठेवून पवित्र जीवन जगण्याची हीच एकमेव पद्धत आहे. फिलीपै ४:८; रोम ८:५ इत्यादि शी तुलना करा.

**"इच्छा असावी"**- किंवा लक्ष दयावे.

**"स्वर्गातील वस्तु"**-फिलीपै ३:१९; १ योहान २:१६,१७.

३:३ **"मेलेला आहात"**-रोम ६:२-४,८; गलती २:२०.

**"जीवन"** ते नवजीवन जे आत्मिक आहे व जे परमेश्वराने विश्वासणाऱ्यांना दिले आहे.

**"लपलेले आहे"**- पृथ्वीवर कोणीहि याला पाहू शकत नाही. कोणताहि शत्रू याचा नाश करण्यास येऊ शकत नाही. (योहान १०:२८,२९) जरी येशूचा हा खजिना दूरचा वाटत असला तरी तो अतिशय जवळचा व सुरक्षित आहे.

३:४ येशू सर्व विश्वासू लोकांचे जीवन आहेत. त्यांच्यात एक नवीन आत्मिक जीवन आहे. कारण येशू त्यांच्या जीवनात आहे; १:२७, योहान ११:२५; रोम ८:९,१०; १ योहान ५:११,१२,२०. ते त्यांच्याशीच जुळेलेले आहेत. (योहान १७:२०:२३) विश्वासणाऱ्यांच्या शरीरात त्यांचेच जीवन वाहत आहे.

**"प्रगट"**-१ तीमथ्य ६:१४; योहान २:२८; ३:२.

**"तेजाने भरलेले"** -योहान १७:२४; रोम ५:२; ८:१७,१८; १ योहान ३:१-३.

३:५ **"मारून टाका"** -वचन १-४ या वचनातील महान सत्यावर पौल आज्ञेचा पाया रचतो. रोम १२:१; इफिस ४:१; आणि ५:१ शी तुलना करा. परमेश्वराने येशूच्या ठायी विश्वासू लोकांना नवीन जीवन दिले आहे. विश्वासू लोकांचे भविष्य अद्भुत आहे. आणि याच आधारावर त्यांचा व्यवहार असावा. आपल्या जीवनातील दुष्टता त्यांनी काढून टाकावी, जरी पापमय स्वभाव काढून टाकणे नसते तर, पौलाने परमेश्वराच्या आत्म्याद्वारे विश्वाणाऱ्यांना असे करण्यास सांगितले नसते. खोटया शिक्षकांच्या (२:३३) कोणत्याहि पद्धतीच्या मदतीने ते असे करू शकत नव्हते. येशूच्या ठायी विश्वासणाऱ्यांना जे सामर्थ्य दिले गेले अहे, त्या सामर्थ्याने ते असे करू शकत होते. पहा रोम ८:४; १३:१४;गलती ५:२२-२५; इफिस ३:१६-२०.

६ कुवासना आणि लोभ (जी मूर्तिपूजा आहे) या सर्वांना मारून टाका. **यामुळेच** स्वर्गिय पित्याचा क्रोध आज्ञाभंग
७ करणाऱ्या लोकांवर येतो. **एक** काळ होता, जेव्हा तुम्ही या सर्व गोष्टीत जीवन जगत होता आणि आपला सर्व
वेळ खर्च करत होता. पण आता या सर्व गोष्टी अर्थात क्रोध संताप, दुष्टता, निंदा मुखाद्वारे शिवीगाळ
९ दूर करून टाका. **एकमेकांशी** (लबाडी)- खोटे बोलू नका कारण तुम्ही जुणे जीवन व त्यातील सर्व कामें
१० दूर करून टाकली आहेत. **तुम्ही** एक नवे जीवन प्रारंभ केले आहे व ते सृष्टिकर्त्याच्या समानतेच्या ज्ञानात नवीन
११ होत जाते. **जेथे** ग्रीक-यहूदी, सुंता झालेले व न झालेले, बर्बर व स्कुथी, दास व स्वतंत्र यांत काहीच अंतर नाही. येशू
१२ या सर्व गोष्टींपेक्षा वर असून ते आम्हां सर्वांत वास करतात. **यास्तव** तुम्ही यहोवा परमेश्वराद्वारे निवडलेल्या
लोकांसारखे पवित्र आणि ''अतिशय प्रिय लोकहो'' स्वत:ला कोमल करूणेने मनाच्या लीनतेने,नम्रतेने व सहनशीलतेने
१३ झाकून घ्या. **जर** कोणाशी भाडण असेल तर, एकमेकाचे सहन करा, व क्षमा करा. ज्याप्रमाणे येशूने तुम्हाला क्षमा
१४ केली, त्याचप्रमाणे तुम्ही देखील एकमेकांशी वागले पाहिजे. **या** सर्व गोष्टींपेक्षा अधिक म्हणजे स्वत: प्रेम धारण करा, हेच
१५ सिद्धतेचे बंधन होय. **यहोवा परमेश्वराची** शांति, तुमच्या मनात शासन करो. कारण याच करता तुमच्या देहाला
१६ निमंत्रण दिले गेले आहे. त्यांना सदा धन्यवाद देत रहा. **येशूचे** वचन संपूर्ण ज्ञानाने तुमच्यात वास करो येशू करता

---

**''शारीरिक लालसा''**-येथे पौल ज्या वाईट गुणंची सूची देतो, त्या जन्मापासून जुळलेल्या आहेत. जसे : डोळे, हात पाय देहाशी जुळलेले आहेत. म्हणूनच अतिशय कठोरतेने त्यांच्याशी व्यवहार केला जावा. मत्तय ५:२९,३०.

**''लोभ''**-किंवा अधिक अपेक्षा करणे -ही एक अशी दुष्टता आहे जी ख्रिस्ती लोकांत मोठ्या प्रमाणावर दिसते.

**''मूर्तिपूजा''**-इफिस ५:५ आपल्या आतील (मनातील) मूर्त्या घृणित व धोकादायक आहेत. जशा बाहेरच्या मूर्त्या. पहा, यहेज्केल १४:३,४.

३:६ **''क्रोध''**-इफिस २:१-३; रोम ३:९-१९.

३:८ **''दूर करावीत''**-इफिस ४:२२-३२.

३:९,१० **''खोटे बोलू नका''**-इफिस ४:२५; स्तोत्र १५:२; नीति १२:२२.

**''चालू केले आहे''**-जेव्हा लोक मन बदलतात. (मत्तय ३:२) आणि येशूवर विश्वास ठेवतात. ते आपल्या जुण्या जीवनाचा त्याग करून नवीन जीवनाचा प्रारंभ करतात. नवीन लोक बनतात २ करिंथ ५:१७. हा नवीन स्वभाव म्हणजे परमेश्वराचे ''स्वरूपच'' आहे, हे आत्मिक, पवित्र व धार्मिकतेचे आहे. (इफि ४:२२-२८). प्रत्येक विश्वासूला स्वत:च्या चुका, दुश्टतेच्या वाईट सवयी, वाईट इच्छा यांच्याशी व्यवहार करायचा आहे. याची एक पद्धत आहे, ती म्हणजे या सर्वांना मारून टाका.

३:११ गलती ३:३८ सर्व विश्वास ठेवणाऱ्यांच्या जवळ एक नवीन स्वभव (नवीन मन)आहे, ते येशू सोबत (पवित्र आत्मा) एकजीव झाले आहेत.

३:१२ **''परमेश्वराचे निवडलेले''**-२ करिंथ ६:१६-१८; १ पेत्र २:९,१०.

**''पवित्र''**-योहान १७:१७-१९ चे नोट्स पहा.

''अतिशय प्रिय लोकांनो'' इफिस १:५; ३:१८,१९; ५:२५,२६; १ योहान ३:१.

''घाला किंवा परिधान करा'' रोम १३:१४.

**''कोमल करूणा.............सहनशीलता''** - फिलीपै २:१, गलती ५:२२,२३.

३:१३ इफिस ४:३२; मत्तय ६:१२,१४.

३:१४ **''या सर्व गोष्टीत... प्रेम धारण करा''**- योहान १३:१४; रोम १२:१०; १ करिंथ १३; इफिस ४:२; फिली २:२; १ योहान ३:१८; ४:७,८. विश्वासू लोकांत सिद्ध एकता केवळ प्रेमाद्वारे येऊ शकते. याला वेगळे ठेवल्यास, स्वार्थ, भांडणे व पक्षपातीपणाच पुढे येईल.

३:१५ **''सृष्टिकर्त्याची शांति''** - योहान १४:२७; फिली ४:६,७. आपल्या जीवनात शांतिचे साम्राज्य असावे; तिच्याच प्रेरणेने आपली कृती प्रेरित व्हावी. आम्हास भयभीत करणारी किंवा आमची शांति हिरावून घेणारी, कोणतीहि गोष्ट आमच्या हातून घडू नये. शांति एखादया कोमल फुलासारखी आहे जी दुष्टतेमुळे कोमेजून जाते.

'हे शरीर'' १ करिंथ १२:१२,१३. याच्याच प्रकाशात आम्ही एकमेकांशी वर्तन करावे.:१ करिंथ १:१०; फिली २:२.

''उपकारस्तुति करत रहा''-१:२;२:७.

३:१६ इफिस ५:१८-२० शी तुलना करा. परमेश्वराच्य आत्म्याने भरणे व येशूची शिकवण(वचन) आपल्या हृदयात ठेवणे या दोहोंचा गाढ संबंध आहे.

**''कायम राहणे''**-इफि ३:१७; स्तोत्र ११९:११. येशूचे जे वचन विश्वासू लोकांना दिले गेले त्याचे वजन पहा. स्तोत्र १:२; अनुवाद ६:६,७; यहोशवा १:८.

**''शिकवत आणि समजवत''**-सर्व विश्वासणाऱ्यांनी एकमेकांना शिकवावे व समजवावे. येशूची शिकवण जर आमच्यात आहे तर नक्कीच असे होऊ शकेल.

३:१७ १ करिंथ १०:३१ शी तुलना करा.

**''स्वामी येशूच्या नांवाने''**-येशूचा स्वभाव, शिकवण, आणि अधिकार यांच्या आधारे येशूच्या जागी या पृथ्वीवर आम्ही विश्वासू आहोत. येथे आमच्या करता एक नियम आहे. येशूच्या अधिकाराने जर आम्ही काही करू शकत नाही, बोलू शकत नाही तर चुपचाप रहावे. विश्वासू फक्त या जगातच येशूच्या जागेवर आहेत. त्यांनी स्वत:च्या इच्छेप्रमाणे जगायचे नाही.

१७ आपल्या मनात भजन व आत्मिक गीताद्वारे एकमेकाला शिकवत व समजवत रहा. **बोलचाल** व कृती या द्वारे जे काही
१८ केले जाते सर्व येशूच्या नावाने व त्यांच्या द्वारे यहोवा परमेश्वराची उपकारस्तुति करा. **स्त्रियांनो,** आपआपल्या पतीचे
१९ म्हणणे ऐका, कारण येशूला ते प्रिय आहे. **पतींनो** आपल्या पत्नींवर प्रेम करा, त्यांच्या करता तुमच्या मनात कोणतीहि
२०,२१ निष्ठुरता नसावी. **मुलांनो** सर्व गोष्टीत आपल्या आई बापांची आज्ञा पाळा कारण येशूला यामुळे आनंद होतो. **बापांनो**
२२ आपल्या मुलांना चिरडीस आणू नका, यामुळे त्यांची हिंमत कमी होता कामा नये. **दासांनो** संसारिक रीतिने जे
तुमचे मालक आहेत, त्यांच्या प्रत्येक आदेशांचे पालन करा. दाखविण्याकरता नव्हे किंवा लोकांना प्रसन्न करण्यासाठी
२३ नव्हे परंतु मनाच्या प्रामाणिकपणने यहोवा परमेश्वराची भीति बाळगून असे करा. **जे** काही तुम्ही करता ते सर्व मन
२४ लावून करा, लोकांसाठी नव्हे तर येशूसाठी करत आहोत असे समजून वागा. **यास्तव** तुम्ही येशूची सेवा करता हे जाणा,
२५ कारण या मुळे तुम्हाला केवळ येशूच्या द्वारे वतनरूप प्रतिफळ प्राप्त होईल. **कारण** जी व्यक्ति चुकीने वागेल, ती त्याचे
४ परिणाम भोगेल. जगाचा स्वामी पक्षपाती नाही. **स्वामींनो** तुमचाही एक स्वामी स्वर्गात आहे असे जाणून आपल्या
२,३ सेवकांना योग्य मोबदला दया. **उपकारस्तुति** करीत प्रार्थना करण्यात तत्पर असा. **आमच्या साठीहि** अशी विनंती करा
की येशूचे रहस्य आणि वचन यासाठी यहोवा परमेश्वराने एक दार उघडावे. याच वचनाच्या सेवेसाठी मी कैदी आहे.
४,५ **यासाठी** की जसे वचन मला बोलले पाहिजे, तसे मी स्पष्टपणे बोलावे. **आणि** वेळेचा सदुपयोग करण्याद्वारे बाहेरच्या
६ लोकांसोबत मी हुशारीने वागावे. **तुमचे** बोलणे सदैव गोड असावे, दयेने परिपूर्ण असावे जेणेकरून लोकांना कसे उत्तर
७ दयावे याची जाणीव तुम्हांस व्हावी. **माझ्या** विषयी तुखिक तुम्हाला सगळे काही कळवील. येशू मध्ये तो एक सज्जन
भाऊ आणि माझ्या बरोबर काम करणरा विश्वासयोग्य दास आहे. मी याच उद्देशाने त्याला तुमच्याकडे पाठवले आहे
९ की आमचे हालचाल तुम्हास कळावे व त्याने तुमची हिंमत वाढवावी. **अनेसिम** विश्वासू व प्रिय व्यक्ति आहे, जो
१० तुमच्यातलाच आहे. ते लोक येथील सर्व समाचार तुम्हास कळवतील. **अरिस्तार्ख** माझ्या सोबतीचा बंदिवान आणि मार्क
(ज्याच्या विषयी तुम्हास कळविले गेले) जो बर्णबाचा भाऊ आहे, तुम्हांला सलाम सांगतो. जर मार्क तुमच्या जवळ आला
११ तर त्याचे स्वागत करा. **येशू** जो युस्त म्हटला जातो, तुम्हास सलाम सांगता. हे सर्व यहूदी मतातून आले आहेत, त्यांनी
स्वर्गिय पित्याच्या राज्याकरता प्रामाणिकपणे परिश्रम केले आहेत. हे असे आहेत की ज्यांच्याद्वारे माझे सांत्वन झाले आहे.
१२ **एफफ्रास** जो तुमच्यातील एक व येशूचा दास आहे, तुम्हास सलाम सांगतो. तो नेहमी-मोठया तत्परतेने प्रार्थनेत परिश्रम
१३ करतो; जेणेकरून तुम्ही परमेश्वराच्या सिद्ध इच्छेनुसार पूर्ण रितीने स्थिर राहावे. **मी** साक्षी आहे की लावदिकीयातील

---

३:१८-२५ इफिस ५:२२; ६:८ यावचे नोट्स पहा.

४:१ इफिस ६:९.

४:२ इफिस ६:१८; लूक १८:१
**"उपकारस्तुति"** - १:१२; २:२७; ३:१५,१७;१थेस्स ५:१८.

४:३ इफिस ६:९:१९,२०.
**"येशूचे रहस्य"**-१:२५-२७ पौल आम्हां सर्वांसाठी एक नमूना आहे. तो सदैव लोकांना येशू विषयी सांगण्याची संधी साधत असे. जणू जो संधीच्या शोधातच राहत असे. दुसऱ्यांना प्रार्थनेची विनंती करत असे.

४:४ **"जसे वचन मी दयावयास हवे"**-आपण वेगवेगळया स्थितीत भिन्न-भिन्न लोकांशी भेटत असतो. केंव्हा कसे बोलावे, आपणस माहित नसते. यासाठी , योग्य समज, प्रार्थना व अध्ययनाची आवश्यकता आहे.

४:५,६ विश्वासणाऱ्यांनी याबद्दल विचार करावा की त्यांच्या शब्दांचा व कृतींचा प्रभाव अविश्वासू लोकांवर कसा पडेल. इतर लोक आमचे जे एकतात, पाहतात वरून ते आपणास समजू शकतात. संधी असल्यावरहि जर आपण येशूचे वचन सांगितले नाही तर त्या लोकांच्या नरकात जाण्याची जबाबदारी आपल्यावरच राहील. प्रेषित २०:२५-२७. लोकांशी बोलताना आपण लीनतेने व नम्रतेने सर्वकाही सांगावे. असे करताना ईश्वरीय कृपेवर आपण भर दयावा. स्तोत्र ४५:२ आणि लूक ४:२२ शी याची तुलना करा.

४:७ **"तुखिक"**-इफि ६:२१.

४:८ **"हिंमत"**-२:२.

४:९ **"अनेसिम"**-२:२; फिलेमोन १०:१२,१६.

४:१० **"अरिस्तार्ख"**-प्रेषित १९:२९; २०:४; २७:२; फिलेमोन २४.
**"बंदिवान"**-वचन १८; इफि ३:१; फिली १:१३.
**"मार्क"**-प्रेषित १२:१२,२५;१३:५,१३; १५:३७-३९; २ तीमथ्य ४:११;फिले २४; १पेत्र ५:१३.

४:११ यहोशवा हे नाव ग्रीक भाषेत येशू होते, परंतु लोक सहसा हे नाव ठेवत नव्हते.
**"स्वर्गिय पित्याचे राज्य"**-मत्तय ४:१७; रोम १४:१७ वरील नोट्स पहा.

४:१२,१३ **"एफफ्रास"** - १:७.
**"मोठया तत्परतेने प्रार्थना"**-२:१ हे त्याच्यासाठी नसून दुसऱ्यांसाठी होते. त्यांच्यासाठी तो आत्मिक विजयाची कामना करतो. शरीराच्या अशक्तपणामुळे व आत्मिक क्षेत्रातील विरोधामुळे, आत्मिक मल्लयुद्ध आवश्यक असते. मत्तय २६:४०,४१; इफि ६:१२; उत्पत्ति ३२:२४-३२ शी तुलना करा. एफफ्रास विश्वासू लोकांसाठी अतिशय आवश्यक गोष्टी अपेक्षित होता. त्या गोष्टी ज्या विश्वासू लोकांसाठी आजही आवश्यक आहेत. स्वर्गिय पित्याची मर्जी जाणण्याची प्रत्येकाची योग्यता असावी. अशी त्याची इच्छा होती. त्यांनी त्यात स्थिर रहावे( १:९-१०) आणि आत्मिक समजुतीचा आनंद लुटावा (इफि ४:१३-१५)

१४ व हेरापलीतील लोकांसाठी व तुमच्यासाठी तो फार श्रम करत आहे. **प्रिय** वैदय लूक व देमास तुम्हांला सलाम सांगतात.
१५,१६ **त्या** बंधुना सलाम जे लावदिकीयात व नुंफा च्या घरी जमतात. **जेव्हा** हे पत्र तुमच्याकडे वाचले जाईल तेव्हा लक्षात
असू दया की लावदिकीयातील मंडळी करता देखील ते वाचले जावे, तसेच लावदिकीयाकडील पत्र तुम्हीहि वाचावे.
१७,१८ **आर्खिप्पाला** सांगा की "त्याने येशूची सेवा काळजीपूर्वक करावी. **हे** अभिवादन मी पौल स्वत: आपल्या हातांनी लिहित
आहे. माझ्या बेडयांची आठवण ठेवा. तुम्हांबरोबर कृपा असो. असेच होवो.

---

"**सदैव**"-शब्दाकडे लक्ष दयावे, "लावदिकीया" वचन १५,१६;२:१

४:१४ "**लूक**"-फिले २४; २ तीमथ्य ४:११. लूक यहूदी नव्हता (वचन ११ शी तुलना करा) तो प्रेषितांची कृत्यें व लूककृत शुभवर्तमानाचा लेखक आहे. मात्र याच ठिकाणी त्याला डॉक्टर-वैदय म्हटले गेले आहे.

"**देमास**"-फिले २४; २ तीमथ्य ४:१०.

४:१५,१६ या पद्धतीद्वारे पौलाचे पत्र (आणि बायबल चे दूसरे अंश) वेगवेगळया मंडळीत प्रचलित झाले. स्मरण असावे की त्या काळी प्रिंटीग प्रेस किंवा दूसऱ्या मशीन्स् नव्हत्या.

४:१७ "**अर्खिप्प**" फिले २. प्रत्येक विश्वासूने या बद्दल सावध असावे की येशूने त्याला दिलेले काम पूर्णपणे करावे. तुलना करा, प्रेषित २०:२४; २ तीमथ्य ४:७.

४:१८ "**आपल्या हातांनी**"-१ करिंथ १६:२१; गलती ६:११; २ थेस्स ३:१७.

"**बेडया**"- वचन १०.